**रत्नागिरी येथे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत...**

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## शासन निर्णय क्र.टीईएम-२०२०/प्र.क्र.१८४/तांशि-४

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २५ मार्च, २०२१.

**वाचा :-** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.मान्यता-२०१५/(१४३/२०१५)/तांशि-५, दिनांक १३ ऑक्टोबर,२०१६

२) राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक २४ मार्च,२०२१ च्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय.

**प्रस्तावना :**

राज्यात सध्या ९ शासकीय व ४ शासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये कार्यरत आहेत. यामधील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता अत्यंत अल्प असून या संस्थांमध्ये पदवी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी मोठया प्रमाणात इच्छूक असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरुन दिसून येते. राज्यात शासकीय तंत्रनिकेतनांच्या तुलनेने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये प्रवेश क्षमता कमी आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची असलेली मागणी विचारात घेऊन प्राप्त परिस्थितीत विभागाच्या अखत्यारितील शासकीय तंत्रनिकेतनातील उपलब्ध साधनसामुग्री, जागा, इमारती आणि मनुष्यबळाचा विचार करुन यांचा योग्य विनियोग करुन कमीत कमी खर्चात ज्या शासकीय तंत्रनिकेनांमध्ये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानंकानुसार अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी आवश्यक पुरेशा सोयी-सुविधा व जागा उपलब्ध आहेत आणि ज्या तंत्रनिकेतनाच्या ठिकाणी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांना मागणी आहे, अशा शासकीय तंत्र निकेतन रत्नागिरी, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ, शासकीय तंत्रनिकेतन धुळे, शासकीय तंत्रनिकेतन जालना, शासकीय तंत्रनिकेतन लातूर (मुलामुलींचे सहशिक्षण) व शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर या संस्थांचे रुपांतरण अभियांत्रिकी महाविद्यालयात करण्याचा निर्णय, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०१५/(१४३/२०१५)/ तांशि-५,
दिनांक १३/१०/२०१६ अन्वये घेण्यात आला आहे.

तथापि, रत्नागिरी जिल्ह्याचे भौगोलिक वैशिष्ट्य व त्या परिसरामध्ये कार्यरत असलेले विविध उद्योगधंदे विचारात घेऊन उच्च दर्जाचे तांत्रिक कौशल्ये प्राप्त असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, याकरिता शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी या संस्थेचे श्रेणीवर्धन न करता रत्नागिरी येथे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याकरिता राज्य

मंत्रीमंडळाच्या दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विचारविनिमय करुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**शासन निर्णय :-**

राज्यात रत्नागिरी, जि.रत्नागिरी येथे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. रत्नागिरी येथील नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून खालील अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | मेकॅट्रानिक्स इंजिनिअरींग | ६० |
| २. | सिव्हील व इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअरींग | ६० |
| ३. | आर्टिफिशिअल इंटेलिजेंन्स व डेटा सायन्स | ६० |
| ४. | इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | ६० |
| ५. | फुड टेक्नॉलॉजी व मॅनेजमेंट | ६० |
| | एकूण | ३०० |

३. रत्नागिरी येथील नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकरीता आगामी ४ वर्षात विहित कार्यपध्दतीनुसार खालीलप्रमाणे टप्प्याटप्प्याने पदे मंजूर करण्यात येतील :-

| वर्ष | प्राचार्य | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक | शिक्षकेत्तर कर्मचारी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष - १ | १ | १ | ३ | १० | १४ | २९ |
| वर्ष - २ | -- | २ | ४ | ११ | १२ | २९ |
| वर्ष -३ | -- | १ | ४ | ११ | १२ | २८ |
| वर्ष - ४ | - | २ | ४ | ११ | १२ | २९ |
| एकूण | १ | ६ | १५ | ४३ | ५० | ११५ |

४. रत्नागिरी येथील नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासासाठी शासकीय तंत्र निकेतन, रत्नागिरी येथे जमिन उपलब्ध असल्याने बांधकाम व तद्अनुषंगिक खर्च, यंत्र सामुग्री व उपकरणे, संगणक, फर्निचर, वेतनावरील खर्च व इतर पायाभुत सुविधांसाठी आवर्ती व अनावर्ती खर्चानुसार आगामी ४ वर्षात खालीलप्रमाणे अंदाजित खर्चास मान्यता देण्यात येत आहे :-

| वर्ष | अनावर्ती खर्च (रुपये लाखात) | | | आवर्ती खर्च (रुपये लाखात) | एकूण (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| | अत्यावश्यक [Essential] | ऐच्छीक [Desirable] | एकूण | | |
| वर्ष -१ | ४३११.०४ | २०२१.८२ | ६३३२.८६ | ४७१.६७ | ६८०४.५३ |
| वर्ष - २ | १५०३.८० | ४४८.५३ | १९५२.३३ | ९०३.८६ | २८५६.१९ |
| वर्ष - ३ | १४४९.६६ | ३१०.९३ | १७६०.५९ | १२९५.४७ | ३०५६.०६ |
| वर्ष -४ | ९३५.७८ | ०.०० | ९३५.७८ | १६८९.७९ | २६२५.५७ |
| एकूण | ८२००.२८ | २७८१.२८ | १०९८१.५६ | ४३६०.७९ | १५३४२.३५ |

त्यानुसार आर्थिक वर्ष २०२१-२२ करीता आवश्यक निधीची तरतूद, पुरवणी अर्थसंकल्पात करण्यात येईल.

५. या निर्णयाच्या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी.

६. हा शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १४६/१४७१, दि.२२ मार्च, २०२१ आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३४७/२०२१/व्यय-५, दि.२४ मार्च, २०२१ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२०२१०३२५१४२९३२५२०८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Satish Jagdeorao Tidke

Digitally signed by Satish Jagdeorao Tidke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=abbed596652773468508d937a99472988ebdda28db8c543b79abe527c99646f6, serialNumber=bedb6cd16bd8fbd810e0a53f2b92ce7fd9ab37dd50427e28109cbb133f9887d3, cn=Satish Jagdeorao Tidke
Date: 2021.03.25 17:49:05 +05'30'

**(सतीश ज. तिडके)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा, विधानभवन, मुंबई
६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. सहसंचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, मुंबई
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
११. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी
१४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१५. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
१६. अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१७. सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभाग
१८. कक्ष अधिकारी (तांशि-५/तांशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई
१९. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती/तांशि-४